

## न्हावा शेवा बंदरात रो-रो सेवा सुरु करा - खा. श्रीरंग बारणे

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगलवार दिनांक 12/08/२०२5 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 179 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# निवडणूक आयोगाच्या विरोधात विरोधी पक्ष रस्त्यावर !

## राहुल गांधींसह अनेक नेते पोलिसांच्या ताब्यात



>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नवी दिल्ली: काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बनावट मतदार यादीच्या मुद्द्यावरुन केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले आहेत. या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी निवडणूक आयोगाने आज विरोधी पक्षाच्या ३० सदस्यांच्या शिष्टमंडळाला बैठकीसाठी बोलावले आहे. मात्र, या बैठकीपूर्वी इंडिया आघाडीतील खासदारांनी निवडणूक आयोगाच्या दिशेने मोर्चा काढला. यादरम्यान, अनेक खासदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

मतचोरीच्या मुद्द्यावरुन सध्या देशातील राजकारण तापले आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदार यादीतील अनियमिततेबाबत गंभीर आरोप केले आहेत. यावरुन आज राहुल यांच्या नेतृत्वात विरोधी पक्षाच्या खासदारांनी संसदेच्या मकर द्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढला. मात्र, दिल्ली पोलिसांनी या मोर्चाला परवानगी नाकरल्यामुळे सर्व आंदोलक खासदारांना रोखण्यात आले.मोर्चा रोखण्यासाठी जागोजागी बॅरिकेडिंग लावली गेली आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यालयाबाहेर दिल्ली




पोलिसांसह निमलष्करी दलाचे जवानही तैनात करण्यात आले. मात्र, अनेक खासदारांनी बॅरिकेडवर चढण्याचा प्रयत्न केला. सपा प्रमुख अखिलेश यादव तर बॅरिकेडवरुन उडी मारून दुसऱ्या बाजुला पोहोचले. याशिवाय तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष आणि महुआ मोइत्रादेखील बॅरिकेडवर चढल्या. पोलिसांनी खासदारांना रोखल्यानंतर सर्व खासदार जागेवरच धरणे आंदोलनावर बसले.भारतीय निवडणूक आयोगाच्या सचिवालयाने काँग्रेस खासदार जयराम रमेश यांना पत्र लिहून दुपारी १२:०० वाजता चर्चेसाठी वेळ दिला होता. जागेअभावी जास्तीत जास्त ३० जणांची नावे कळवावीत अशी विनंती आयोगाने केली होती. मात्र, सर्व विरोधी पक्षाचे खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयात जाण्यावर ठाम होते. पोलिसांनी खासदारांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, मात्र कुणीही ऐकायला तयार नव्हते. अखेर दिल्ली पोलिसांनी राहुल गांधी, प्रियंका गांधी, संजय राऊत आणि सागरिका घोष यांच्यासह इतर अनेक खासदारांना ताब्यात घेतले.

# निवडणूक आयोगावर आरोप,मग सरकारची मध्यस्थी का? - उद्धव ठाकरे

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यशैलीवर टीका करत मतदान प्रक्रियेत घोळ झाल्याचा गंभीर आरोप केला होता. त्यांच्या आरोपामुळे देशभरात एकच खळबळ उडाली. मतदान प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी काही पुराव्यांचं सादरीकरण केलं होतं.

दरम्यान, राहुल गांधींच्या या आरोपानंतर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत केंद्र



सरकारवर टीका केली आहे. सरकारने स्वत:च्याच हाताने लोकशाहीला काळ फासलं आहे. ही लढाई निवडणूक आयोगाबरोबर आहे. मात्र, त्यात भाजपा आणि सरकार का पडतंय? हे आता उघड झालं आहे. कशा पद्धतीने मतांची चोरी झाली याचं सहप्रमाण राहुल गांधींनी दाखवून दिलं आहे.

तसेच याबाबत पत्रकार परिषद देखील त्यांनी घेतली. मात्र, त्यानंतरही निवडणूक आयोग त्यांना सांगत आहे की शपथपत्र द्या. मग हा कोणता उलटा कारभार आहे?", अशी टीका उद्धव ठाकरेंनी केली.

"आता बिहारमध्ये लाखो मतदारांची नावं वगळण्यात येत आहेत. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाला निवडणूक आयोग सांगत आहे की ज्या मतदारांची नावे ओघळली त्यांची यादी तुम्हाला द्यायला आम्ही बंधनकारक नाहीत.

मला आता एक प्रश्न विचारायचा आहे की सर्वोच्च न्यायालयापेक्षा निवडणूक आयोग किंवा निवडणूक आयुक्त मोठे आहेत का? निवडणूक आयुक्त हे पद सर्वोच्च न्यायालयापेक्षा मोठं पद आहे का? मला वाटतं की हा सर्वोच्च न्यायालयाचा अपमान आहे.

याबाबत सर्वोच्च न्यायालय काय निर्णय घेतं? ते आम्हाला देखील पाहायचं आहे. लोकशाहीची ही लढाई तुम्ही चिरडून टाकण्याचा प्रयत्न करत आहात", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# ‘बिन लग्नाची गोष्ट’ - नात्यांच्या चौकटी मोडणाऱ्या गोष्टीचा हटके प्रवास

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




नात्यांच्या पारंपरिक चौकटींना धक्का देणारा आणि एक नव्या विचारांची झलक देणारा ‘बिन लग्नाची गोष्ट’ या आगामी मराठी चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. प्रेक्षकांची उत्सुकता वाढवणारा हा टीझर लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या आधुनिक संकल्पनेवर आधारित असून, नात्यांची नवीन व्याख्या मनोरंजनात्मकरित्या मांडतो.

चित्रपटाच्या टीझरमध्ये उमेश कामत आणि प्रिया बापट यांची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळत आहे. लिव्ह-इनमध्ये राहात असलेल्या या जोडप्याच्या आयुष्यात लग्नाआधीच गरोदरपणाचे वळण येते आणि त्यात एक अनपेक्षित ट्विस्टही दिसतो. याचबरोबर गिरीश ओक आणि निवेदिता सराफ यांचे नातेही पारंपरिक चौकटींपेक्षा काहीसे वेगळे असल्याचे दिसत आहे.

दिग्दर्शक आदित्य इंगळे म्हणतात,“प्रेक्षकांकडून टीझरला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. हा चित्रपट एक वेगळी संकल्पना घेऊन येतोय आणि त्यात नात्यांचा भावनिक प्रवास उलगडतो. उमेश आणि प्रिया यांच्या नैसर्गिक अभिनयामुळे ही कथा अधिक वास्तवदर्शी वाटते.”

निर्माते नितीन वैद्य म्हणतात, “चित्रपटाची गोष्ट हटके असली तरी ती आपलेपणाची भावना देणारी आहे.

निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांसारखे अनुभवी कलाकार या कथेला अधिक भावनिक खोली प्रदान करतात. प्रेक्षकांना हा चित्रपट नक्कीच भावेल, असा विश्वास वाटतो.”

बिन लग्नाची गोष्ट’ हे चित्रपट गॉडगिफ्ट एंटरटेन्टमेंट प्रा. लि. आणि एस. एन. प्रॉडक्शन्स यांनी निर्मित केला असून, तेजश्री अडिगे आणि नितीन वैद्य प्रॉडक्शन प्रस्तुत आहे.

या चित्रपटात प्रिया बापट, उमेश कामत, निवेदिता सराफ आणि गिरीश ओक यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

कथा समीर कुलकर्णी यांची असून, दिग्दर्शन आदित्य इंगळे यांचे आहे.

# शेतकऱ्यांवर अन्याय ; अखिल भारतीय छावा संघटना आक्रमक

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवड : हिंजवडी पांडवनगर या ठिकाणी दि. ०७/०८/२०२५ रोजी साधारण दुपारी २ ते ३ चे दरम्यान शेतकरी बांधव, पी एम आर डी चे अधिकारी तसेच स्थानिक नागरिक हे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार शंकर मांडेकर अतिक्रमणाबाबत चर्चा करीत असताना त्यांचे समक्ष हिंजवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे यांनी सदर चर्चेमध्ये खंड पाडून काही शेतकरी बांधव यांना धक्काबुक्की करुन शिवीगाळ करणेस सुरुवात केली.**



सदर वरिष्ठ पी आय यांच्या या कृत्यास उपस्थित असलेले सर्व नागरिक यांनी विरोध केला असता त्यांनी पोलिस बळाचा गैरवापर करुन सदरील सामान्य शेतकरी बांधव व नागरिकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला.

अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेश महासचिव मनोज मोरे म्हणाले की हिंजवडी येथिल हिंजवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे यांनी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना केलेली अरेरावी आणि शिवराळ भाषा अशोभनीय आहे. सरकारचा आणि पी एम आर डी चा जो चाललेला अनागोंदी कारभार शेकऱ्यांना मारणारा आणि हिंजवडी मान, मारुंजी रोड येथील बिल्डर लॉबीला तारणारा आहे. शेकऱ्यांना विश्वासात घेवून सरकारने भविष्यातील निर्णय घ्यावा. नुकतीच आम्ही पिंपरीची चिंचवडचे पोलिस आयुक्त यांची भेट घेवून निवेदन दिले आहे. सदरील अधिकाऱ्यावर कारवाई न झाल्यास छावा संघटनेचे शिष्ट मंडळ मुख्यमंत्र्यांना भेटणार आहे.

अखिल भारतीय छावा संघटना प्रदेश अध्यक्ष व शेतकरी नेते व विजय घाडगे पाटील व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे म्हणाले की शेतकऱ्यांच्या जीवावर उठलेल्या, मग्रूर, मदमस्तवाल पोलीस अधिकारी बालाजी पांढरे यांच्यावर गृहमंत्र्यांनी कडक कारवाई करण्यात यावी. शांतपणे चर्चा सुरू असताना हिंजवडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पी. आय बालाजी पांढरे यांनी चर्चेत सहभागी होण्यासाठी बोलवले असता त्यांनी त्यांनी अत्यंत खालच्या भाषेत आणि शिवराळ भाषा वापरली.ही अत्यंत चुकीची आहे. संबंधीत घटनेतील दोषींवर कारवाई न झालेस अखिल भारतीय छावा संघटने मार्फत तीव्र स्वरुपाचे आंदोलन करणेत येईल.

अशी माहिती आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी अखिल भारतीय छावा मराठा युवक संघटनेचे मनोज आण्णा मोरे - प्रदेश महासचिव, मच्छिंद्र चिंचोळे - पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष, अक्षय बोडके - पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रशांत फड सर - शिक्षक आघाडी पुणे जिल्हा अध्यक्ष, सचिन लिमकर - पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष आणि अन्याय ग्रस्त शेतकरी बांधव उपस्थित होते.

# दुचाकी चोरणारा चोरटा जेरबंद ; 15 दुचाकी जप्त

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी- चिंचवड: चाकण पोलिसांनी दुचाकी चोरट्याला बेड्या ठोकल्या आहेत. अशोक मधुकर सोनवणे हा बनावट चावीने दुचाकीच लॉक काढून दुचाकी लंपास करायचा. अशोक सोनवणे याच्याकडून चाकण पोलिसांनी तब्बल ८ लाखांच्या १५ दुचाकी जप्त केल्या आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या काही




दिवसांपासून चाकण परिसरात दुचाकी चोरण्याच प्रमाण वाढलं होत. पोलीस चोरट्याचा शोध घेत होते.

अखेर सीसीटीव्ही फुटेजवरून सराईत अशोक सोनवणेचा शोध घेण्यात आला.गेल्या काही दिवसांपासून चाकण परिसरात दुचाकी चोरण्याच प्रमाण वाढलं होत. पोलीस चोरट्याचा शोध घेत होते. अखेर सीसीटीव्ही फुटेजवरून सराईत अशोक सोनवणेचा शोध घेण्यात आला.

इमारतीच्या पार्किंगमधील किंवा रस्त्यावर पार्क केलेल्या दुचाकी बनावट चावीच्या आधारे अशोक सोनवणे हा दुचाकी लंपास करायचा.

दुचाकीचा आवाज येऊ नये म्हणून बंद दुचाकी लांब घेऊन जाऊन सुरू करून पसार व्हायचा. ही कारवाई चाकण पोलिसांनी केली आहे.

# बांधकाम व्यावसायिकाकडून फसवणूक ; ठेकेदाराची आत्महत्या

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: कात्रज घाटात रंगकाम करणाऱ्या ठेकेदाराने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. ठेकेदाराला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरुन एका बांधकाम व्यावसायिकाविरोधात भारती विद्यापीठ पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

चंदर पिराजी मोहिते (५६, रा. विनय सागर आर्केड, त्रिमूर्ती चौकाजवळ, भारती विद्यापीठ परिसर) असे आत्महत्या केलेल्या ठेकेदाराचे नाव आहे. याबाबत मोहिते यांची पत्नी शकुंतला (५६)



यांनी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बांधकाम व्यावसायिक संतोष चोरगे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चंदर मोहिते हे गृहप्रकल्पातील रंगकामाचा ठेका घेतात. आरोपी बांधकाम व्यावसायिक चोरगे हे मोहिते यांच्या ओळखीचे होते. चोरगे यांनी त्यांना तीन गृह प्रकल्पांमध्ये रंगकाम करण्याचे काम दिले होते.

या कामाच्या बदल्यात चोरगे यांनी मोहिते यांना एक सदनिका आणि साडेदहा लाख रुपये देण्याचे मान्य केले होते. मोहिते यांनी परिचितांकडून हातऊसने पैसे घेऊन तीन गृहप्रकल्पाचे रंगकाम पूर्ण केले होते. व्यवहारात ठरल्यानुसार चोरगे यांनी मोहिते यांना पैसे, तसेच सदनिका देण्याचे मान्य केले होते. मोहिते यांनी रंगकामाचे पैसे मागितले. तेव्हा चोरगे यांनी मोहिते यांना जातीवाचक शिवीगाळ केली.

शिवीगाळ, तसेच फसवणूक केल्याने मोहिते यांनी १ ऑगस्ट रोजी मध्यरात्री कात्रज घाटातील अन्विषा ला ॅजमागील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली,

असे मोहिते यांच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. सहायक पोलिस निरीक्षक आवारे पुढील तपास करत आहेत.

# नाना काटे यांच्या वाढदिवसानिमित्त माउलीच्या मंदिराला देणगी

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

नाना काटे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांचे सहकारी मच्छिंद्र काटे,राहुल काटे,हर्षल काटे,सचिन झिंजुर्डे, प्रतीक काटे, श्रेयस काटे, संतोष काटे, उदय माझीरे, ओंकार काटे, भूषण काटे यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी येथे देणगी जमा करण्यात आली.

येत्या १५ ऑगस्ट रोजी संत ज्ञानेश्वर माउलींच्या मंदिराला २२ किलो सोन्याचा सुवर्णकलश बसवण्यात येणार आहे.

यावेळी हि देणगी नाना काटे यांच्या हस्ते संस्थान चे विश्वस्त ह.भ.प.पुरुषोत्तमदादा पाटील यांना सुपूर्त करण्यात आली.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांना अभिषेक करून मनोभावे दर्शन घेऊन नानांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
शुक्रवार दिनांक 01/08/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# न्हावा शेवा बंदरात रो-रो सेवा सुरु करा - खा. श्रीरंग बारणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ - पिंपरी, चिंचवड, तळेगाव आणि चाकण हा परिसर देशातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. या उद्योजकांना उत्पादनाची निर्यात करताना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाहतूक कोंडीत वेळ जातो. त्यासाठी न्हावा शेवा बंदरात रोल-ऑन, रोल-ऑफ (रो-रो) सुविधा सुरु करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे केली आहे.

याबाबत केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांची खासदार बारणे यांनी दिल्लीत भेट घेतली. खासदार बारणे म्हणाले,पिंपरी, चिंचवड, तळेगाव



आणि चाकण हा औद्योगिक पट्टा देशातील सर्वात मोठ्या ऑटोमोबाईल उत्पादन केंद्रांपैकी एक म्हणून ओळखला जातो. या औद्योगिक पट्ट्यात ११ हून अधिक प्रमुख ऑटोमोबाईल उत्पादन कारखाने आणि ४,००० हून अधिक सहायक युनिट्स आहेत,. जे ऑटोमोबाईल निर्यातीसाठी महत्त्वाचे आहे.

बजाज ऑटो, टाटा मोटर्स, महिंद्रा अँड महिंद्रा, फोक्सवॅगन, मर्सिडीज-बेंझ, ह्युंदाई, जनरल मोटर्स, फोर्स मोटर्स, पियाजिओ, हिरो मोटोकॉर्प ऑटोमोबाईल उत्पादक कंपन्या आहेत. सध्या, रो-रो सेवा केवळ मुंबई पोर्ट अथॉरिटी (माझगाव/कुलाबा क्षेत्र, दक्षिण मुंबई) मध्ये उपलब्ध आहेत. जिथे दिवसा गंभीर वाहतूक कोंडी आणि नो-एंट्री झोनमुळे प्रवेश प्रतिबंधित आहे. यामुळे केवळ लॉजिस्टिक्स विलंब होत नाही तर निर्यातदारांसाठी वाहतूक खर्चातही मोठी वाढ होते.

औद्योगिक दृष्टिकोनातून मुंबई पोर्ट अथॉरिटी (माझगाव): तळेगाव एमआयडीसीपासून १४० किमी, न्हावा शेवा बंदर (जेएनपीटी) तळेगाव एमआयडीसीपासून ११० किलो मीटर आहे. न्हावा शेवा बंदर औद्योगिक क्षेत्राच्या जवळ आहे. महामार्ग कनेक्टिव्हिटी चांगली आहे.

त्यामुळे ऑटोमोबाईल वाहतुकीसाठी अधिक योग्य बनेल. न्हावा शेवा येथे पुरेशी जागा उपलब्ध आहे. ज्याचा वापर रो-रो सेवा सुरू करण्यासाठी केला जाऊ शकतो. ही सुविधा सुरू केल्याने केवळ ऑटोमोबाईल उत्पादकांच्या निर्यात लॉजिस्टिक्सलाच मदत होणार नाही.

तर, नवीन रोजगाराच्या संधीही निर्माण होतील.जे सरकारच्या 'मेक इन इंडिया' आणि 'व्यवसाय सुलभता' या दृष्टिकोनाशी सुसंगत असल्याचे खासदार बारणे यांनी निवेदनात म्हटले आहे.

या धोरणात्मक हालचालीमुळे ऑटोमोबाईल उद्योगाला फायदा होईल, प्रादेशिक विकासाला चालना मिळेल आणि जागतिक स्तरावर भारताची निर्यात स्पर्धात्मकता बळकट होईल, असेही ते म्हणाले.

# कर्मचारी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांचा राज्यव्यापी मेळावा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महाराष्ट्र राज्य महानगरपालिकांमधील कामगार प्रतिनिधींचा राज्यव्यापी मेळावा रविवार दिनांक १० ऑगस्ट, २०२५ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या कार्यालयात सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आला होता. मेळाव्याचे प्रस्ताविक फेडरेशनचे प्रवक्ते गौतम खरात यांनी केले. या राज्यव्यापी बृहन्मुंबई, पुणे, नागपुर, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, कल्याण-डोंबिवली, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई, सोलापुर, मिरा भाईंदर, भिवंडी-निजामपुर, अमरावती, नांदेड-वाघाळा, कोल्हापुर, पनवेल, उल्हासनगर, सांगली-मिरज-कुपवाड, मालेगांव, जळगांव, लातुर, धुळे, अहिल्यानगर, परभणी, इचलकरंजी आदी महानगरपालिकांचे कामगार नेते उपस्थित होते. या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न, मागण्या शासन दरबारी प्रलंबित असून सदर मागण्या व प्रश्न तडीस लावण्यासाठी दिनांक २४ ऑगस्ट, २०२५ रोजी महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिका कामगार, कर्मचारी यांचा राज्यव्यापी मेळावा स्व. शंकर (आण्णा) गावडे स्मृती कामगार भवन, थेरगांव येथे आयोजित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये विविध महानगरपालिकेतील कामगारांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रामुख्याने ज्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना ३ ते ४ महिन्यांपासून मासिक वेतन न मिळणे, जुनी पेन्शन योजना लागु करणे, वाढते



कंत्राटीकरण,त्रटी कामगारांना मनपा सेवेत कायम करणे, रुग्णालयांमध्ये नर्सिंग कौन्सिल आणि सलीम मर्चंट अवॉर्डप्रमाणे रुग्ण आणि कर्मचाऱ्यांचे प्रमाण निश्चित करणे तसेच राज्यातील सर्व महानगरपालिका कर्मचाऱ्यांना चांगली वैद्यकीय सेवा लागु करणे आदी प्रश्नांवर चर्चा करणेत आली.वरील मागण्यांसंदर्भात दिनांक २४ ऑगस्ट, २०२५ रोजी आयोजित केलेल्या मेळाव्यामध्ये हे प्रश्न सोडवून, कामगारांच्या प्रलंबित मागण्या राज्य सरकारकडून मान्य करुन घेण्याचा निर्धार करण्याच्या अनुषंगाने आंदोलनाची पुढील दिशा मेळाव्यात निश्चित केली जाईल असे महाराष्ट्र राज्य महानगरपालिका-नगरपालिका, कामगार-कर्मचारी संघटना फेडरेशनचे अध्यक्ष शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे यांनी सांगितले.आजच्या मेळाव्यात कामगारनेते शशिकांत ऊर्फ बबनराव झिंजुर्डे (पिंपरी-चिंचवड), शशांक राव, रमाकांत बने अशोक जाधव, वामन कविस्कर (बृहन्मुंबई), मोहन तिवारी, चेतन आंबोणकर, वीरपाल भाल (ठाणे), उदय भट, मधुकर राकेश विटकर (पुणे) जगदीश देशमुख (नाशिक), अड. स्वप्निल काशीद (नवी मुंबई), गणेश शिंगे (नांदेड), गौतम खरात (छत्रपती संभाजीनगर), केशव आंधळे (परभणी), दिलीप शिंदे (सांगली), प्रल्हाद कोतवाल (अमरावती), विकास लगारे (इचलकरंजी), दिनकर आवाळे, अजित तिवले (कोल्हापुर) सतिश चंडालिया, आनिल कांबळे (पनवेल), दिपक राव (भिवंडी) बापुसाहेब सदाफुले (सोलापुर), अंकुश गायकवाड (लातुर),प्रविण तंतरपाळे (नागपुर), रमेश जगताप (मालेगांव) आदी पदाधिकारी उपस्थित होते. मेळाव्यातील उपस्थितांचे आभार मोहन तिवारी यांनी मानले.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579